# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ०४.०७.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०३.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०७ केसेसमध्ये ०७ ईसमांवर कारवाई करून ७,६८,९९०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०१ केसेसमध्ये ०१ इसमांवर कारवाई करुन १,५९०/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली १,८३६ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,०१,२५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग पोलीसांची कामगिरी :— अग्नी शस्त्र व तलवार बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०४.०७.२०२६ चे ०२.१५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा पथकाचे अधिकारी व अंमलदार हे शहरात कोंबींग ऑपरेशन राबवित असतांना, त्यांनी मिळालेल्या माहीतीवरून, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत, प्लॉट नं. ६८५, सुदामपुरी, हनुमान मंदीर जवळ राहणारा आरोपी नामे प्रेमसिंह जितेंद्र बैस, वय २२ वर्षे याच राहते घराची पंचासमक्ष घरझडती घेतली असता, त्याचे ताब्यात काळ्या रंगाचे देशी बनावटीचे ०१ अग्नीशस्त्र मॅगझीनसह व ०५ जिवंत काडतुस तसेच, हॉकीस्टीक चे आकाराची लोखंडी तलवार मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन प्राणघातक अग्नीशस्त्र मॅगझीनसह व ०५ जिवंत काडतुस, मोबाईल फोन व तलवार असा एकुण किंमती ७३,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस अग्नीशस्त्राबाबत विचारपुस केली असता, त्याने ते त्याचा साथीदार पाहीजे आरोपी नामे राहुल राजेंद्र ठाकरे, वय ३६ वर्षे, रा. मिरे ले—आऊट, प्रसन्ना बार जवळ, सक्करदरा, नागपुर याचेकडुन आणल्याचे सांगीतले. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने अग्नीशस्त्र जिवंत काडतुससह व तलवार बाळगुन मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे सक्करदरा येथे आरोपीविरूध्द कलम ३, ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव सक्करदरा पोलीसांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री.

दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (अती.कार्य. गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील, पोहवा. लक्ष्मण चौरे, प्रकाश माथनकर, किशोर ठाकरे, पोअं. नितीन वासने, कमलेश क्षिरसागर व मपोअं. पुनम शेंडे यांनी केली.



**<u>३) गुन्हेशाखा युनिट क्र. २ व वाडी पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास अटक.</u>**

दिनांक ०४.०७.२०२६ चे ००.३० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. २ व वाडी पोलीसांचें पथक हे शहरात कोंबींग ऑपरेशन राबवित असतांना, त्यांनी मिळालेल्या माहीतीवरून पोलीस ठाणे वाडी हद्दीत प्लॉट नं. २५६, हरीओम सोसायटी, दत्तवाडी, वाडी, नागपुर येथे राहणारा हद्दपार ईसम नामे कुणाल देवराव सातपुते, वय ३५ वर्षे, यास पंचासमक्ष त्याचे राहते घरी चेक केले असता, तो मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परीमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०२/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे वाडी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव वाडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (अती.कार्य. गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि. अमित बंडगर, पोहवा. रोशन फुकट, पोअं. विनोद कुंभलकर यांनी गुन्हेशाखा युनिट क्र. २ चे अधिकारी व अंमलदार यांचेसह संयुक्तीकरित्या केली.

**<u>४) गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांची कामगिरी :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

फिर्यादी श्रीमती सरीता अशोक खुरपडी वय ३७ वर्ष रा. आजनी गादा ता. कामठी जि. नागपूर यांची बहिण नामे सौ. भाग्यश्री विनोद रजक वय ३५ वर्ष ह.मु. रा. गादा कामठी, जि. नागपूर हिचा प्रेमविवाह सन २०१० मध्ये विनोद रजक रा. जबलपुर ह.मु. उप्पलवाडी, कपीलनगर याचेसोबत झाला होता. तो दारु पिण्याचे सवईचा असल्याने तो तिचे चारित्रावर संशय घेऊन भांडण करीत असे. या त्रासाला कंटाळून भाग्यश्री ही नवऱ्याला सोडून माहेरी आली होती. माहेरी राहत असतांना तिने सन २०२३ मध्ये राजेंद्र नत्थुजी कोटरुंगे वय ४५ वर्ष रा. नांदगाव, येसंबा ता. पारशिवनी जि. नागपूर याचेसोबत मंदीरात दुसरे लग्न केले होते. दुसरा पती राजेंद्र हा सुदधा भाग्यश्री हिला मारझोड करुन त्रास देत असल्याने, ती त्याला सोडून आपले बहिणीकडे कामठी, गादा येथे राहून खाजगी काम करीत होती. दरम्यान दुसरा पती राजेंद्र हा तिला तिचे कार्यस्थळी व माहेरी जाऊन

'घरी चल' असे म्हणून नेहमी त्रास देत असे. त्यांचा वाद गादा ग्रामपंचायत सरपंच व पोलीस पाटील यांचेकडे नेला असता, तेथे राजेंद्र वापरत असलेल्या दुचाकीचे मासिक हफ्ते भाग्यश्री भरत असल्याने तिने गाडीची चाबी त्याचेकडून हिसकावून घेतली होती. त्याचा राग आल्याने, त्याने भाग्यश्रीला पाहून घेण्याची धमकी दिली होती. दिनांक ०२.०७.२०२६ रोजी सकाळी भाग्यश्री आपले कामावर गेली असता, तेथून सायंकाळी १७.४० वा. तिने तिचे मुलीसोबत फोनद्वारे संपर्क केला होता. परंतु ती नेहमीप्रमाणे वेळेवर घरी न आल्याने फिर्यादी हया भाग्यश्रीचे शोधार्थ शिरपुर रोडने जात असता, पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीत घोरपड ते शिरपूर रोडवर भाग्यश्री ही रक्तबंबाळ व मृत अवस्थेत मिळून आली. तिला कोणीतरी कोणत्यातरी धारदार शस्त्राने वार करुन जिवानिशी ठार केले अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नवीन कामठी येथे आरोपीविरूध्द कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात, गुन्हेशाखा युनिट ६ चे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशिर माहीतीवरून आरोपी हा मृतक हिचा दुसरा पती असल्याचे निष्पन्न करून, तांत्रीक तपास करून तो बडनेरा येथे असल्याचे खात्रीशीर माहीतीवरून, बडनेरा रेल्वे स्टेशन येथे रेल्वे पोलीसांचे मदतीने सापळा रचुन, आरोपी नामे राजेंद्र नत्थुजी कोटरूंगे, वय ४५ वर्ष, रा. नांदगांव येसंबा, तह. पारशिवनी, जि. नागपुर यास ताब्यात घेतले. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव नविन कामठी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (अती.कार्य. गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भरत कन्हाडे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



<u>५) कुख्यात गुंड हद्दपार :—</u>

पोलीस ठाणे तहसिल हददीत, **टिमकी, तिनखंबा चौक, कोलबास्वामी वाचनालय समोर, नागपूर येथे राहणारा गुन्हेगार ईसम नामे सुरेंद्र उर्फ कल्लु लिलाधर होले, वय २५ वर्षे** याचेविरूध्द पोलीस ठाणे तहसिल, हुडकेश्वर, सक्कदरा, नंदनवन, पाचपावली, वाठोडा, बुट्टीबोरी केळवद येथे घरफोडी, चोरी, दरोडा, दुखापत करणे, मारपिट करणे, दरोड्याची तयारी ईत्यादी गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता तहसिल पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. पोलीस उपायुक्त, परीमंडळ क्र. ०३ नागपुर शहर याचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परीमंडळ क्र. ०३, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. २५/२०२६ दिनांक १९.०६.२०२६ अन्वये गुन्हेगारास नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतुन ०१

वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला. नमुद गुन्हेगाराचे हद्दपार आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली.

वरील कामगिरी मा. श्री. राहुल मदने पोलीस उपायुक्त (परि. क्र. ३), मा. श्रीमती अनिता मोरे, सहा. पोलीस आयुक्त (कोतवाली विभाग), वपोनि. संजय मेंढे पो.ठाणे तहसिल यांचे मार्गदर्शनात पोनि. राहुल वाढवे (गुन्हे), सफौ. राजेश ठाकुर, पोहवा. रामकैलास यादव, फिरोज खान, पोअं. विनोद कातुरे, वैभव कुलसुंगे व संदीप शिरफुले यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे मानकापुर :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपीविरुध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०४.०७.२०२६ चे ०१ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत प्लॉट नं. ५५, लालाजी डहारेचे घरी किरायाने, जमील सोसायटी, एलआयसी कॉलोनी समोर, गोधनी रेल्वे, मानकापुर येथे राहणारे फिर्यादीचे पती नामे मेहताबसिंग सोहनलाल चौधरी, वय ४३ वर्षे हे त्यांचे घराचे लोखंडी पत्र्याचे शेडमध्ये झोपलेले असतांना, कोणीतरी काळ्या रंगाचे हाफ टि—शर्ट व हाफ बरमुडा घातलेल्या ईसमाने कुऱ्हाडीसारख्या धारदार शस्त्राने फिर्यादीचे पतीचे डोक्यावर वार करुन, त्यांना जिवानिशी ठार केले.

फिर्यादी श्रीमती गिता मेहताबसिंग चौधरी, वय ४० वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे पोउपनि. अजय जाधव ९८२३०६९२५१ यांनी आरोपीविरूध्द कलम १०३(१),३३३ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे एमआयडीसी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०१.०७.२०२६ चे १०.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचा पुतण्या नामे शैलेष दालीराम भुरे, वय २३ वर्ष, रा. प्लॉट नं. १६, एकात्मता नगर, एमआयडीसी, नागपूर हा त्याचे पल्सर मोटारसायकल क्र. एमएच ४९ ए ४६०८ ने पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीतील, संगम रोड, डेंटल कॉलेज गेट समोर, वानाडोंगरी येथुन जात असता, बोलेरो पिकअप गाडी क्र. एमएच ४० वाय ०२६९ चे चालकाने, त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे पुतण्याचे मोटारसायकलला धडक देवुन गभीर जखमी केले. जखमी यास उपचाराकरीता लता मंगेशकर हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक ०३.०७.२०२६ चे ०६.४५ वा. डॉक्टरांनी त्यास तपासून मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी पप्पु दिवानजी भुरे, वय ४२ वर्ष रा. प्लॉट नं. १६, श्रीकृष्ण नगर, एमआयडीसी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे पोउपनि. हेमंत कोकणी ८८०५९९४१०० यांनी आरोपी बोलेरो चालकाविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १७७,१८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे नविन कामठी :—** सौ. निता रवि जांभुळकर, वय ३५ वर्षे, रा. वाल्मीकी शाळेजवळ, रमा नगर, कामठी, नागपूर ह्या दिनांक २५.०९.२०२१ चे १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ४ इंच, केस— काळे लांब, अंगात— गुलाबी रंगाची साडी व ब्लाऊज घातलेले आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**२) पोलीस ठाणे नविन कामठी :—** मोहम्मद ईब्राहीम वल्द मन्सुर अहेमद, वय ५१ वर्षे, रा. बिबी कॉलोनी, कामठी, नागपूर हे दिनांक २९.०४.२०२६ चे ०५.०० वा. पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीतील राहते घरी

कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग– सावळा, चेहरा– लांबट, बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट ७ इंच, केस– काळे, अंगात– गुलाबी रंगाचा शर्ट व काळ्या रंगाचा फुल पॅन्ट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.



सौ. निता



मो. ईब्राहीम

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**